# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/2937

दिनांक :- 19 SEP 2024

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**
बी.बी.ए., बी.बी.एम.बी.एम.सी.बी.सी.ए,
एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिगेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन संचालनालयाच्या मान्यतेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/BBABCAडीटीई मान्यता/२०२४/६६२ दिनांक २८ ऑगष्ट २०२४.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/१९८४ दिनांक ९ ऑगष्ट २०२४.
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/२०२८ दि. १६/८/२०२४.
४.शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक मान्यता २०२४/प्र.क्र.२४५/तांशि ४ दि. ७/८/२०२४.
५.विकाअ/शिक्षण/२०२४/२१४१ दिनांक २९ ऑगष्ट २०२४.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए. बी.बी.एम.बी.एम.एस., बी.सी.ए. एमबीए इंटिग्रेटेट आणि एमसीए इंडिग्रेटेट या अभ्यासक्रमांच्या संस्थांना तसेच या संस्थातील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थातील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन संचालनालयाच्या मान्यता घेण्याबाबत आपणास वारंवार पत्राव्दारे कळविलेले आहे.

तथापी असे निदर्शनास आले की, काही संस्थांनी अजुनपर्यंत सदरची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तेव्हा अश्या संस्थांना कळविण्यात येते की, सदरची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत **दिनांक २०/९/२०२४** पर्यंत या कार्यालयास आवश्यक कागदपत्रे सादर करुन आवश्यक कार्यवाही करावी. यानंतर कोणत्याही परिस्थतीत मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्यासाठी.